महा मेट्रो

PUNE METRO

**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड मध्ये नवीन तीन संचालकांची नेमणूक**

पुणे ३० ऑक्टोबर २०१९: महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी पुणे व नागपूर येथील मेट्रो रेल प्रणाली कार्यान्वित करीत आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीच्या कामाचा व्याप वाढल्यामुळे नवीन संचालनकांच्या नियुक्त्या करण्याची गरज भासू लागली होती. पुणे आणि नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाचे काम जलदगतीने सुरु असून त्याला अजून चालना देण्यासाठी तीन नवीन संचालकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

नवनियुक्त तीन संचालक पूर्णतः पुणे मेट्रो प्रकल्पाचे काम हाताळणारा आहेत. यामुळे पुणे मेट्रो प्रकल्पाला मोठी चालना मिळणार आहे . संचालक (प्रकल्प), संचालक (यातायात आणि अनुरक्षण ) आणि संचालक ( योजना ) असे तीन नवनियुक्त संचालक असणारा आहे. संचालकाच्या नेमणूक प्रक्रिया नुकत्याच पार पडल्या असून श्री. अतुल गाडगीळ यांची संचालक (प्रकल्प ) या पदावर नेमणूक झाली आहे. त्याचबरोबर श्री. विनोद कुमार अग्रवाल यांची संचालक ( यातायात आणि अनुरक्षण ) या पदी नियुक्ती झाली आहे. आणि श्री. रामनाथ सुब्रमण्यम यांची संचालक (योजना ) या पदी नेमणूक झाली आहे.

श्री. अतुल गाडगीळ यांनी भारतीय आद्योगिक संस्था दिल्ली येथून बी टेक व एम टेक सिविलची पदवी प्राप्त केली असून त्यांना दिल्ली आणि जयपूर मेट्रो येथे काम करण्याचा १७ वर्षाचा अनुभव आहे. २ )श्री. विनोद कुमार अग्रवाल हे इंडियन रेल सिग्नल व टेलिकॉम सर्विस (IRSSE) च्या १९८८ तुकडीचे अधिकारी असून त्यांना २९ वर्षे भारतीय रेल्वे मध्ये कामाचा अनुभव आहे . ३) रामनाथ सुब्रमण्यम हे एक्सएलआरआय जमशेदपूर या संस्थेमधून ( मेनेजमेंट ) ची पदवी प्राप्त केली आहे. तदनंतर त्यांनी

इएनएएम सिक्युरिटीज (ENAM SECURITIES) , टीएआयबी सिक्युरिटीज (TAIB Securities) , एएनव्हीआयएल शेअर्स अँड स्टॉक ब्रोकर्स ( Anvil share & stock Brokers) , आय डी एफ सी - एसएसकेआय सिक्युरिटीज ( IDFC-SSKI SECURITIES) , and गोल्डमन एसचस असेट मॅनेजमेंट मुंबई (Goldman Sachs Asset Management Mumbai ) येथे कार्यकारी संचालक पदावर कामाचा अनुभव आहे .